# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ १३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जावक क्र.मजीप्रा/रास/तांशा.१/३५०/१३१३

दिनांक १४/१२/२०००

## // परिपत्रक क्रमांक ५६ //

विषय :- नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागणाऱ्या जागेच्या भूसंपादना बाबत

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत तयार करण्यात येत असलेल्या नागरी तथा ग्रामीण पाणी पुरवठा योजना या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या असतात. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे काम केवळ एजन्सी स्वरुपाचे असते, म्हणूनच या पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर कार्यान्वित करुन या योजनेसाठी वापरलेल्या जमिनीसह व इतर स्थावर व जंगम मालमत्तेसह संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात येतात.

या पाणी पुरवठा योजना तयार करतेवेळी आवश्यक ती खाजगी मालकीची जमिन भूसंपादन अधिनियमाव्दारे संपादित करण्यात येते, तथापी ही कार्यवाही करतेवेळी संपादित करणारी संस्था म्हणून (Acquiring Body) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा उल्लेख कागदोपत्री करण्यात येतो, मात्र ज्यांच्या मालकीच्या या योजना आहेत, त्या स्थानिक स्वराज्य संस्था मात्र या भूसंपादनाच्या कार्यवाहीमध्ये पूर्णपणे अलिप्त रहातात. परिणामी भूसंपादना संदर्भात जी काही न्यायालयीन प्रकरणे उदभवतात त्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणालाच संबंधित पक्षकारामार्फत गोवण्यात येते, त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांचा वेळ व श्रम या न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करण्यात नाहक खर्च होतो. संपादन अधिकाऱ्याने केलेल्या चुकीच्या कार्यवाहीमुळे मुळ मालकाऐवजी तिसऱ्याच व्यक्तीची जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात दिल्यामुळे एका प्रकरणात न्यायालयाने आर्थीचे बांधकाम पाडून टाकण्याचे आदेश देखील दिले आहेत. थोडक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची भूसंपादना संदर्भात काही एक जबाबदारी नसताना केवळ भूसंपादन अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे व विलंबामुळे होणाऱ्या परिणामांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणालाच सामोरे जावे लागते. हे टाळण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना सर्व मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांना देण्यात येत आहेत.

१) भूसंपादन करतेवेळी कागदोपत्री संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नावाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करुन ती पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी. प्राधिकरणाचे काम केवळ योजना पूर्णपणे तयार करुन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ताब्यात देणे एवढेच असल्याने Acquiring Body म्हणून कोठेही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा संबंध पोहोचू देऊ नये. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्वरित भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांकडून करुन घेण्याबाबत आग्रह धरावा व त्यानंतरच खात्री झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्थेकडून, लेखी स्वरुपात, योजना पूर्ण करण्यासाठी जागेचा ताबा घ्यावा.

२) भूसंपादन अवॉर्ड झाल्यावर संबंधित खाजगी जमिन मालक वाढीव नुकसान भरपाईसाठी उच्च न्यायालयापर्यंत धाव घेतात अशा वेळी न्यायालयात योग्य तो प्रतिवाद करणे, ही विशेष भूसंपादन अधिकारी व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचीच जबाबदारी असते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण केवळ तांत्रिक स्वरुपाचे काम करणारी एजन्सी आहे. हे लक्षात घेऊन भूसंपादना संदर्भात भविष्यात उदभवणाऱ्या कोणत्याही न्यायालयीन प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थाच जबाबदार राहील व त्यासाठी होणारा न्यायालयीन खर्च देखील संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेलाच करावा लागेल अशा प्रकारचे लेखी हमीपत्र प्राधिकरणाने स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्राप्त करुन घेतल्याखेरीज, योजनेचे कामास सुरुवात करु नये.

३) योजना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या असल्याने विद्युत कनेक्शन घेण्यासाठी लागणाऱ्या अर्जावर देखील संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचेच नाव येईल व कनेक्शन देखील त्यांचेच नावाने नोंद होईल याचीही कृपया दक्षता घेण्यात यावी.

४) योजनेच्या संपादित जमिनींसाठी शासनाचा अकृषिक कर देखील प्राधिकरणाकडून (योजना हस्तांतरीत होईपर्यंत) भरावा लागतो. हे टाळण्यासाठी जमिनीचे भूसंपादन ७/१२ चा उतारा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नावाने होईल याची काळजी घेण्यात यावी जेणेकरुन अकृषिक कर भरण्याची जबाबदारी सुध्दा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचीच राहील.

५) वरील मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी यापुढे करण्यात यावी व नंतरच प्रत्यक्ष योजनेचे तांत्रिक कामास सुरुवात करावी. या मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्यामुळे प्राधिकरणास कोणत्याही स्वरुपाचे आर्थिक नुकसान झाल्यास किंवा अनावश्यकरित्या न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागल्यास, त्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात येऊन पुढील कारवाई म.ना.से.(शिस्त व अपील) नियमांतर्गत करण्यात येईल. याची देखील नोंद घ्यावी.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई ३२
मा.राज्यमंत्री पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय मुंबई ३२
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
सदस्य सचिव (प्रशासन) म.जी.प्रा. मुंबई २१
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. विभाग (सर्व)
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा.नवी मुंबई
अधीक्षक अभियंता म.जी.प्रा.मंडळ (सर्व)
कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग (सर्व)

M. J. P.
ISSUED
19 DEC 2000
MUMBAI-21